किंमत रु. १५/-

# पालकनीती

पालकत्वाला वाहिलेले मासिक
वर्ष १५ • अंक ५ • १६ऑगस्ट २०१५



**पा ल क नी ती**

पालकत्वाला वाहिलेले मासिक

**संपादक**
संजीवनी कुलकर्णी

**संपादक मंडळ**
प्रकाश अनभूले
मधुरा राजवंशी
वसीम मणेर
सोमीनाथ घोरपडे
नीला आपटे
मंजिरी निंबकर

**मुखपृष्ठ छायाचित्र व मांडणी**
रमाकांत धनोकर

**अंक मांडणी, छायाचित्रे व रेखाटने**
वसीम मणेर

**अक्षरजुळणी**
स्वाती जामदार

**जानेवारी ते डिसेंबर २०१५ साठी वर्गणी रु.२००**

वर्गणीचा चेक / ड्राफ्ट
'पालकनीती परिवार'
या नावाने काढावा.



**संपर्क :**
**पालकनीती परिवार,**
प्रगत शिक्षण संस्था
रिंग रोड, लक्ष्मीनगर,
फलटण ४११५२३
०२१६६ २२३०४१

psspalakneeti@gmail.com
www.palakneeti.org



पालकनीती परिवाराचे प्रकाशन
वर्ष १५ वे अंक ५ वा
१६ ऑगस्ट २०१५



लेखांत व्यक्त झालेली मते लेखकांची व्यक्तिगत समजावीत.


## या अंकात

वाचन संस्कृती आणि वाचनालयांचे महत्त्व विशद करणारा पालकनीतीचा जुलैचा अंक होता. मुलांना खूप वेगवेगळ्या प्रकारचे साहित्य वाचायला मिळणे हे त्यांच्या समजेच्या वाढीसाठी आवश्यक आहेच. पण त्याचवेळी हेही लक्षात घ्यायला हवे की वाचन हा खूपच वैयक्तिक व आंतरिक अनुभव आहे. तो प्रत्येकाचा वेगळा असणार आहे. कोणत्या प्रकारच्या वाचनातून कुणाला काय मिळणार हे त्याचे अनुभव वा चिंतन यांवरही अवलंबून असणार आहे. वाचनाबाबतचे काही वैयक्तिक अनुभव या अंकात वाचनाची विविधांगी ओळख करून देतात.


- **वाचन नेमकं काय करतं?** – वसीम मणेर
- **वाचन आणि मी** – प्रथमेश इनामदार
- **वाचनाची गोष्ट** – यशवंत देशमुख
- **प्रवास...** – कल्पिता दंडवते
- **विचार करून पाहू** – नीलिमा गोखले, मंजिरी निंबकर
- **शहाणी वेबपाने – बहुरूपी गूगल भाग २** – प्रकाश अनभूले


प्रिय वाचक,

पालकनीती हे मासिकपत्र अठ्ठावीस वर्षं चालवल्यावर तोपर्यंतच्या संपादक मंडळानं 'आता आम्ही तांत्रिक व्यवस्थांचे सहकार्य करू, आर्थिक व्यवस्थाही करू, पण नव्या मंडळींनी हे मासिक चालवावे,' अशी जाहीर विनंती केलेली होती. त्या विनंतीला फलटणच्या प्रगत शिक्षण संस्थेच्या तरुण कार्यकर्त्यांनी प्रतिसाद दिला होता. त्यानंतर दोन हजार पंधरामधील अंकांची योजना आणि रचना या नव्या गटानं करायला घेतली. आजवर त्यांचे नव्या, ताज्या दमाचे आठ अंक आपल्यासमोर सादर झालेले आहेत. आणखी तीन अंक (त्यातला एक जोड अंक) ते करणारही आहेत.

म्हणजे, सुरुवातीला त्यांनी दिलेल्या वचनाप्रमाणे एका वर्षाच्या अंकांची जबाबदारी पूर्ण होणार आहे. त्यापुढे अंक चालवता येतील किंवा नाही याबद्दल प्रयत्न करून पाहू आणि मगच निर्णय सांगू, असे त्यांनी म्हटले होतेच; त्यानुसार डिसेंबरनंतर अंक चालवणे शक्य होणार नाही असा निर्णय त्यांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे अंक थांबवायचा आधीचा निर्णय आपोआप लागू होतो. तो मान्य करायचा की काही वेगळा प्रयत्न करून बघायचा, असा विचार आम्ही सर्व मिळून वाचकांसमोर मांडत आहोत. महाराष्ट्रात आज अनेकविध संस्था बालविकासाच्या आणि बालशिक्षणाच्या क्षेत्रात काम करतात. मासिक चालवण्यासाठी आवश्यक असलेली तांत्रिक आणि काही प्रमाणात आर्थिक व्यवस्था पालकनीतीकडे आहे. सहकार्य करायची तयारीही आहे. काही संस्थांनी पुढे येऊन काही अंकांची (किमान ६) जबाबदारी घेतली तर त्या संस्था करत असलेले काम सर्वांपर्यंत पोचवण्यात पालकनीतीचा हातभार लागू शकेल.

काही संस्था अशा विचारांनी पुढे आल्या तर त्यापुढची चर्चा त्यांच्यासह करता येईल. अनौपचारिकपणे काही संस्थांशी बोलणे सुरूही झालेले आहे. मात्र अद्याप कोणत्याही निर्णयाशी आपण पोचलेलो नाही. तरी वाचकांना या कल्पनेत रस वाटला आणि तसा प्रयत्न करून पाहावासा वाटला तर प्रियंवदा बारभाई (९८२२४७५८२३) किंवा संजीवनी कुलकर्णी (९८२२००१४७७) यांच्याशी बोलावे.

आपले नम्र,
पालकनीती संपादक मंडळ


संपादक, मुद्रक, प्रकाशक व मालक – डॉ. संजीवनी कुलकर्णी यांनी पालकनीती परिवार करिता ग्रीन ग्राफीक्स, सी–१०२, सुनिता अपार्टमेंट, १४१७ कसबा पेठ, पुणे–४११०११ येथे छापून घेऊन अमृता क्लिनिक, संभाजी पूल कोपरा, कर्वे रस्ता, पुणे–४११००४, येथे प्रकाशित केले.



या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतीलच असे नाही.

# संवादकीय

महाराष्ट्र शासनाने नुकतेच शाळाबाह्य मुले मोजण्यासाठी एक दिवसाचे एक राज्यव्यापी सर्वेक्षण घडवून आणले. ते  खरोखरच किती मुले शाळाबाह्य आहेत हे जाणून घेण्याच्या तळमळीपोटी केले की 'आम्ही एक दिवसाचा धडक कार्यक्रम कसा घडवून आणला' याबद्दल शेखी मिरवण्यासाठी केले हे पुढे स्पष्ट झालेच. बरे पुढे त्या शाळाबाह्य मुलांसाठी काही योजना आहे का? तर तसेही काही दिसत नाही. मग हा सारा सव्यापसव्य उगीचच केला गेला तर. त्या दिवशी शाळेत जाणाऱ्या मुलांना खिचडी खाण्यापुरती तासभर शाळा घेऊन सोडून दिले तर शिक्षकांना दिवसभर राबवून घेतले (जे इमाने-इतबारे राबले त्यांना). निष्पत्ती? शून्य.

सर्वेक्षणातून बाहेर आलेले आकडे आणि नंतर शासनानेच जाहीर केलेले आकडे यात फारच मोठी तफावत दिसली. महाराष्ट्राने बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा पारित केलेल्याला ४ वर्षे होऊन गेली. तरीही अजून लाखो मुले शाळाबाह्य का आहेत याचा विचार व्हायला हवा. आणि मग त्यावर उपचारही व्हायला हवा.

शाळाबाह्य मुलांबद्दल विचार करताना, कधीही शाळेत न गेलेली आणि शाळेत पोहोचलेली परंतु तिथून मधूनच बाहेर पडलेली (ड्रॉपआऊट) या दोन्हींचा समावेश सर्वेक्षणात केला गेला. ही सर्व मुले समाजाच्या निम्न आर्थिक स्तरातील व विविध मागासवर्गीय जाती-जमातींची आहेत. त्यापैकी बहुसंख्य भूमिहीन मजूर असून अनेकांना स्वतःचे म्हणावे असे खोपटेही नाही. काही भाड्याच्या खोलीत किंवा झोपडीत राहतात तर काही कामाच्या ठिकाणी छप्पर उभारून राहतात. घरे लहान असतात किंवा नसतातच. त्यामुळे कित्येक मुले रात्री झोपायला समाजमंदिरात किंवा प्रार्थनास्थळात असतात. तेथे इतर मोठ्या मुला-माणसांच्यात ती झोपतात. मोठे झोपणार तेव्हा रात्री १२-१ वाजता मुले झोपणार. तोपर्यंत मोठ्यांच्या गप्पा ऐकत, त्यांचे नशापाणी बघत ती जागत राहतात.  सकाळी काम असेल तर मोठी मुले उठून आपापल्या कामावर जातात. त्यातील कोणीतरी येता जाता हलवून उठवले तर ही शाळकरी मुले लवकर उठणार. अन्यथा वर्दळ सुरू झाल्यावरच त्यांना जाग येणार. सरकारी संडासात प्रातर्विधी उरकून, तेथील नळाखाली बिन साबणाची आंघोळ करून मूल घरी पोहोचेपर्यंत आई-बाप कामाला निघून गेलेले असतात. झाकून ठेवलेला भाकरतुकडा खाऊन मूल शाळेत जायला तयार होते. केसाला तेल-फणी असेल तर असेल, शर्ट-चड्डीला बटण असेल तर असेल, दप्तराच्या पिशवीला बंद असेल तर असेल अशा अवस्थेत बिनगृहपाठाचे मूल शाळेत पोचते. तिथे गृहपाठ न केल्याने किंवा उशिरा पोहोचल्याने मानहानीकारक बोलणे ऐकून घ्यावे लागणार नाही याची काही शाश्वती नाही. आणि मानहानीचा त्रास सतत सहन करावा लागल्यास ही मुले शाळेतून बाहेर पडणार, ती कायमचीच.

या मुलांच्या कुटुंबांकडे पाहिले तर कित्येकदा त्यांना एकच पालक असतो. दुसरा पालक मृत किंवा परागंदा असतो. तो एक पालकही कधी शाळेत पालक सभेला हजर राहत नाही. कारण कामावर खाडा होतो. पालकसभाही पालकांच्या सोयीनुसार सकाळी ८ च्या आत किंवा संध्याकाळी ७ च्या नंतर न होता शाळेच्या सोयीने होतात. अनेक मुलांना तर दोन्हीही पालक नसून मूल आजी किंवा दुसऱ्या कोणा नातेवाईकांकडे राहत असते. बरेचदा घरात टी.बी. किंवा तत्सम काही असाध्य रोगाने पीडित एखादी व्यक्ती असते. बालपणापासून आबाळ झाल्यामुळे या मुलांची रोगप्रतिकारक शक्ती कमी असते व आजारी पडण्याचे (व त्यामुळे शाळा बुडण्याचे) प्रमाण इतर मुलांपेक्षा जास्त असते. या मुलांनी आपल्या जीवनात विविध प्रकारची शारीरिक, भावनिक, मानसिक हिंसा अनुभवलेली असते. घरी आई, बाप, आजी किंवा घरातले किंवा आजूबाजूचे कोणीही मोठे माणूस त्यांना मारहाण करीत असते. तर शाळेत पुष्कळदा शिक्षक आणि इतर मुले यांना मारतात. शाळेत कुणाचे काही हरवले किंवा काहीतरी अनुचित घडले तर सर्वात प्रथम संशय घेतला जातो तो या मुलांचा. शाळेत त्यांच्याकडे जितक्या संशयी नजरेने पहिले जाते तितक्याच संशयी नजरेने ही मुले समाजाकडे पाहात असतात. ती कधी शाळेशी, शिक्षकांशी जवळीक साधण्याचा प्रयत्न करीत नाहीत. शाळेच्या मध्यमवर्गीय संस्कृतीशी ती कधी एकरूपच होत नाहीत. याचे कारण त्यांची संस्कृतीच वेगळी आहे. तिला संयुक्तिकरित्या दारिद्र्याची संस्कृती (culture of poverty) म्हटले जाते.

सारी मुले शिकावीत असे वाटत असेल तर शाळेने, समाजाने, शिक्षण खात्याने आधी ही दारिद्र्याची संस्कृती समजून घेतली पाहिजे. नियमितता, सातत्य, उपस्थिती, गृहपाठाची पूर्तता, विशिष्ट भाषा व वर्तणुकीची अपेक्षा इत्यादी शाळेशी निगडीत मध्यमवर्गीय नियम व मूल्यांना थोडी मुरड घालायला शिकले पाहिजे. शाळेत समान संधी उपलब्ध करून द्यायला हव्यात. याचा अर्थ सर्वांना एका वर्गात बसवून एकाच प्रकारे शिकवायचे असा नाही. दारिद्र्याच्या संस्कृतीतून येणाऱ्या मुलांना अवकाश द्यायला हवा, साहित्य पुरवायला हवे व समजूतदारपणा दाखवायला हवा. या मुलांच्या भाषेला वर्गात स्थान द्यायला हवे तसेच त्यांच्या बाबतीत वापरली जाणारी भाषाही उपहासात्मक, टोचणारी नको. जुन्यापुराण्या बाराखडी व पाढे पाठांतरावर आधारलेल्या पद्धतीं (पेडॅगॉजी) ऐवजी नव्या, पठडीबाहेरच्या, सृजनशील, कल्पनाशक्तीला वाव देणाऱ्या पद्धतींचा वापर करायला हवा. संगणकासारखे तंत्रज्ञान वापरायला हवे. दारिद्र्याच्या संस्कृतीतून येणाऱ्या मुलांना मुख्य धारेत आणण्यासाठी त्यांना सुरक्षित आणि पर्यवेक्षित असणारी खेळघरे, बालभवने, पूरक वर्ग यासारखी ठिकाणे समाजात उभी राहायला हवीत. या ठिकाणी अभ्यासात मदत करणारी, मुलांशी बोलू, खेळू शकणारी प्रौढ माणसे असावीत. जी मदत व आधार त्यांना घरून मिळत नाही तो शाळेने व समाजाने त्यांना द्यायला हवा. तरच ही मुले कुठल्यातरी पिढीत त्या दारिद्र्याच्या संस्कृतीतून बाहेर पडू शकणार आहेत. शिक्षण हाच दारिद्र्य निर्मूलनाचा मार्ग आहे. रोजगार हमीने फक्त पोट भरते. शिक्षणाने मात्र चांगल्या जीवनाचा मंत्र मिळतो.

● ● ●

# वाचन नेमकं काय करतं?

– वसीम मणेर



सकाळी सकाळी भांडणाच्या आवाजानं बाहेर आलो तर शेजारच्या चाळीची मालकीण– काकी आपल्या चार भाडेकरू बायांना ओट्यावर घेऊन बसली होती. त्या बायांचे नवरे भिंतीला चिकटून लावलेल्या आपापल्या सायकली–मोटारसायकलींवर, अंगात बनियन आणि खाली टॉवेल गुंडाळून पारोसे बसले होते.

''आमच्याकडं एकच फॅनय, तरी आमी का पाश्शे बिल द्यायचं? ह्यांच्याकडं दोन फॅन, एक टीवी आणि रातभर नाईट बल चालतो. तुमी त्यांना सांगा काकी!'' खोली नंबर एकची सविता फणकारत बोलली.

''आमी काय चौवीस तास नाय लावत टीवी. पवारबाईचा नवरा मध्ये पडला. अन आमी दोन फॅन लावून झोपू नाय तर एक. तुमी कशाला आमच्या घरात बगताय?''

''गड्यांनी मदी बोलायचं काम नाय.'' काकीनं त्याला दरडावलं.

''तुमचा टीवी मला म्हयताय...मी पन बगते की! पन जय मल्हार झालं की बंद करावा तर नाय! तुमचं शिनेमं रातभर चालत्यात.''

''काकी मीटर तोडून द्या की शेपरेट सगळ्यांना... उगं डोक्याला कलई नको,'' मोटारसायकलवाला बोलला. त्याला कामाला जायची घाई झाली होती.

''मीटर शेपरेट करण्यापेक्षा तुमीच खोल्या खाली करा. मीटर शेपरेट कराय सांगतोय... पैशे कोन तुजा बा भरनार का? भाडं ते देत नाय टायमावर... आन मीटर शेपरेट करा म्हनं!''

चार खोल्यातले भाडेकरू, आलेलं लाईट बील कुणी किती द्यायचं यावरून भांडत होते. कुणाचं एकमत होत नव्हतं. हमरीतुमरीवर येत होतं. काकीचं म्हणणं भाडेकरूंनी आपसात सोडवावं आणि तिला खर्चात पाडू नये. तर भाडेकरू एकमेकांवर आरोप करण्यात व्यस्त. या सगळ्यात जवळजवळ दोन तास गेले तरी तोडगा निघत नव्हता. कुणी शहाणपण दाखवून वाद संपवण्याच्या दिशेने वाटचाल करत नव्हतं. ही सगळी शिकलेली मंडळी. का साक्षर म्हणायचं यांना? की म्हणायचं अक्षर ओळख आहे, एवढंच? कारण इथे पवारबाईच्या घरात येतो पुढारी, सविताचा नवरा वाचतो सामना आणि काकी स्थानिक दैनिक ऐक्य. काकी वारीलाही जाते आणि ज्ञानोबा–तुकोबांचे अभंग तोंडपाठ. सदा परमार्थाचा संदेश देणारे अभंग आणि रोजच्या घडामोडींचं वृत्त सांगणारी वर्तमानपत्रं वाचनात असली तरी साधे प्रश्न सुटत नाहीयेत. इथे प्रश्न लोक ग्रामीण–निमशहरी भागातले आहेत आणि स्थानिक वर्तमानपत्र वाचताहेत हा नसून वाचनाचा आणि समजेचा बंध किती पक्का आहे, हा आहे. द हिंदू दैनिक वाचणारे, मोठ्यामोठ्या पुस्तकातील दाखले देत सामाजिक असमानतेवर वाद घालणारे सामाजिक संशोधन संस्थेतील काही विद्यार्थी हँड सॅनिटायझर घेतल्याशिवाय 'फील्ड'वर जात नाहीत, असं चित्र दिसतं. इंग्रजी पुस्तकांचा आणि मासिकांचा फडशा पाडणाऱ्या उच्चभ्रू लोकांची, आपली बिल्डिंग बिल्डरला रीडेव्हलपमेंटला देण्यावरून आणि इंच इंच एफएसआयवरून होणारी हमरीतुमरी शहरी लोकांना काही नवी नाही. दर रविवारची आख्खी सकाळ या वादावर घालवणारी आणि असं महिनोंमहिने चाललेली सभा मी स्वतः पाहिलेली आहे. आणि तिथेही बहुतांच्या हातात लठ्ठ पेपरबॅक इंग्रजी रहस्य कथा–कादंबऱ्या असतात. त्या लेखकांच्या म्हणे तीस–तीस कादंबऱ्या सहज असतात. कसं वाचतात एवढं

आणि कसं लिहितातही एवढं? आणि एवढं वाचून-लिहूनही समज वाढलेली असते का हा प्रश्न अनुत्तरित राहतो.

वाचण्यावरून आठवलं. इयत्ता दुसरीत असेन मी. बाजारात माझ्या चाचाच्या दुकानावर गेलो होतो. शेजारी एक 'अप्सरा ड्रेसेस' नावाचं दुकान होतं. 'अप्सरा ड्रेसेस, होजिअरी, ब्रा, पँटी' अशी पाटी होती. वाचन जेमतेम येत होतं. होजिअरी कसंबसं वाचलं पण अप्सरा आणि ड्रेसेस काही जमेना. खूप प्रयत्न केला मग कंटाळलो आणि चाचाला विचारलं,

''उ होजिअरी के उप्पर क्या लिकेला है?''

''अप्सरा ड्रेसेस,'' चाचा आपलं काम चालू ठेवत मानही न वर करता म्हणाला.

''आन निच्चे?''

काम थांबवून चाचानं चमकून माझ्याकडे बघितलं, पाठीत एक रट्टा हाणला आणि म्हणाला, ''जा भाग घरकू.''

त्याचंही बरोबर होतं, कारण त्यानं जर ते वाचलं असतं तर माझा पुढचा प्रश्न होता, ''म्हणजे काय?'' हा प्रस्तावित धोका ओळखून त्यानं रट्टा हाणून स्वतःची सुटका करून घेतली होती. त्यावरून मला हे उमगलं होतं की बोर्डवर लिहिलेलं काहीतरी भयंकर आहे! पण मग ते बोर्डवर का लिहिलंय ते मात्र कळत नव्हतं. त्यामुळं एक झालं भर रस्त्यात दिवसा उजेडी असलेली वाचनावरची सेन्सॉरशिप मला कळू लागली. मग विशिष्ट सिनेमांचे पोस्टर, स्त्रियांच्या कपड्यांची आणि देशी दारूची दुकानं अशा जागी न घुटमळता पुढं जायचं, नाहीतर मार ठरलेला, हे समजू लागलं. म्हणजे समज तयार झालीच की वाचनामुळं!

वाचन माणसाला नेमकं करतं काय असा प्रश्न मला कायम पडलेला आहे. माणूस प्रगल्भ होतो, जगाचं ज्ञान मिळतं, कौशल्य कमावतो, करमणूक होते. पण वाचनानं माणसाची समज वाढते का, हा माझा कुतूहलाचा विषय आहे आणि त्याचीच जरा उकल करता येते का हे पाहातोय मी.

शहाणपण वाचनातून येतं का? आणि येत असेल तर कोणाला येतं? वाचणारे आणि न वाचणारे असं विभाजन हे शहाणपण आणि शहाणपणाचा अभाव अशा दोन सरळ सरळ भागांमध्ये परावर्तित होत नाही असं मला वाटतं. मग वाचन नक्की काय करतं? वाचनाबद्दल कायम 'त्यानं हे होतं, ते होतं' असं म्हटलं जातं. थोरामोठ्यांच्या गोष्टींमध्ये वाचनाचा उल्लेख आढळतो. वाचनाचं आणि त्यांच्या थोरत्वाचं घट्ट नातं दिसतं. पण त्याचबरोबर वाचणाऱ्यांची संख्या आणि थोरांची संख्या यांचं गुणोत्तर काही जुळत नाही, या वास्तवाकडे मला दुर्लक्ष करवत नाही. किंवा न वाचता थोर झालेल्यांची संख्याही काही कमी नाही. मग वाचन नक्की काय करतं, असा प्रश्न पुन्हा येतो. तर समज वाढवतं. पण सामना आणि पुढारीसारखी वृत्तपत्रं वाचणारे वाचक आणि द हिंदू वाचणारे वाचक यांची समज एकाच प्रमाण पट्टीवर सम प्रमाणात वाढते आहे असं म्हणणं जरा भाबडेपणाचं ठरेल. कारण वर्षानुवर्षं वाचणारे लोक तीच वृत्तपत्रं वाचतात, तेच लेखक वाचतात आणि तीच समाजमानसाची समज बाळगून असतात. किंबहुना जे वाचू तेच खरं मानून दंगल घडवणारे, किवा साधी सरळ मतं बनवणारे सुद्धा समजेच्या पातळीवर अत्यंत निम्न स्तरावर नाहीत का? मग मानवी मूल्यांचा विकास करण्याचं काम वाचनानं कुठं केलं का? ते झाल्याचा पुरावा दिसतो का? असं वाटतं. चिंतनातून वाचनाच्या वेगवेगळ्या अवस्था आहेत का? असा विचार पुढे येतो. वाचन ही कृती म्हणून केलेली वेगळी, सवय म्हणून केलेली वेगळी आणि वाचन करताना त्याचा मेंदूशी होणारा समागम आणि द्वंद्व ही अवस्था वेगळी. आणि तिसऱ्या अवस्थेत समजेची पातळी वाढण्याची आणि रुंदावण्याची शक्यता जास्त असे म्हणता येईल का? असे प्रश्न पडतात.

शांततेचा मार्ग सांगण्याचा दावा करणाऱ्या सर्व धर्मग्रंथांची आणि त्यांचं पठण करणाऱ्या आक्रमक लोकांची कमी नाही हे आपण पाहतो. एककल्ली विचार करणारे लोक आणि त्यांची वाचनाची निवड जोखणं अत्यंत सोपं होऊन जातं. सामना आणि पुढारी वाचणारे सकाळ वाचत नाहीत आणि सकाळ वाचणारे म.टा. नको म्हणतात. पोलीस टाईम्सचा तर एक वेगळाच वाचकवर्ग! त्यात खून चोरी बलात्काराची यमकं का जुळवलेली असतात ते आजवर न सुटलेलं कोडं! काय चालू असतं संपादकाच्या मनात? माझ्या लहानपणी संध्यानंद नावाच्या वृत्तपत्रानं विश्वभरातल्या चमत्कृती छापून धमाल उडवून दिलेली मला आठवते. आध्यात्मिक आणि पाककलेचा विभाग पुस्तक प्रदर्शनात गर्दीचा असतो तर रेल्वे-बसस्थानकावर मायापुरी आणि चित्रलेखाचा भरणा असतो. सार्वजनिक किंवा खाजगी जागांमध्ये जसं जसं ऊन वारा पाऊस लागणं कमी होतं, तसं तसं इकनॉमिक टाईम्स, मिंट अशी वृत्तपत्रं, तर फिल्मफेअर, टाईम, आउटलुक अशी मासिकं दिसू लागतात. सामाजिक, आर्थिक आणि जातीय स्तर मासिकं-वृत्तपत्रंसुद्धा लेऊन असतात. पण तिथंही वाचनातून समजेच्या पातळीवर काय घडतंय याचा तपास लागणं जरा अवघड आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक घरात त्या त्या धर्मानुरूप असलेला/ले धर्मग्रंथ आणि त्याचा घरात परावर्तित होणारा अर्थ यांचं समीकरण जुळताना दिसत नाही. किंबहुना, त्या पुस्तकातील लेखनाचा अर्थ, त्याची व्युत्पत्ती, त्याची चिकित्सा आणि त्याचे मथितार्थ यांकडे सर्वात जास्त दुर्लक्ष झालेलं दिसतं. त्या पुस्तकाचं पावित्र्य जपणं आणि त्याला पुजून ठेवण्याकडे जास्त ओढा असतो. त्यापलीकडे जाऊन ते एक पुस्तक आहे आणि ते काही ज्ञान देऊ शकतं, आणि त्या ज्ञानाची चिकित्साही होऊ शकते असं पाहिलं जाताना दिसत नाही.

टीव्हीवर नवाजुद्दीन सिद्दीकी या अभिनेत्याची मुलाखत चालू होती. काहीच यश मिळत नाही म्हटल्यावर गावी परत जाण्याचा विचार मनात आला का, असा प्रश्न विचारल्यावर नवाजुद्दीन म्हणाला, हो खूपदा आला. पण राहिलो इथंच.

प्रश्नकर्त्याचं काही समाधान नाही झालं.

मग कसं ठरवलं की राहायचं? काय मनात आलं?

(पान १५ वर)

# वाचन आणि मी

- प्रथमेश इनामदार



प्रथमेश इनामदार हा कमला निंबकर बालभवनचा माजी विद्यार्थी. सध्या कला शाखेच्या पहिल्या वर्षात शिकत आहे. पुढे सामाजिक व राजकीय प्रश्नांवर अभ्यास करण्याचा त्याचा मानस आहे.

दुपारची वेळ. सगळीकडे शांतता आहे. अधूनमधून झाडांची सळसळ होत आहे. पक्ष्यांचा किलबिलाटही कानावर पडतो आहे. वर्गातल्या शिकवण्याने लय पकडलेली आहे. आणि अस्मादिक मनगटी घड्याळाकडे पाहतात. तास संपण्यास अजूनही अवधी असतो. या तासानंतर मुलांना जेवणासाठी अर्ध्या तासाचा विश्राम मिळणार असतो. याच कालावधीत मुलांना जेवणाबरोबरच एकमेकांशी 'गॉसिप्स' शेअर करणे, एकमेकांचा डबा वाटून खाणे अशी कामे करायची असतात. मी मात्र दप्तरातील पुस्तक वाचण्यासाठी या वेळेचा उपयोग करणार असतो. शेवटी मधली सुट्टी होते आणि मुलांच्या इतका वेळ संथ असलेल्या हात, पाय (आणि तोंड) या अवयवांना अचानक गती येते. आणि काही काळ मुलांचा सामुदायिक आवाज टिपेला पोहोचतो. मी शांतपणे हा कोलाहल निवळण्याची वाट पाहात असतो.

हळूहळू कोलाहल कमी होतो आणि वर्गात पुन्हा शांतता पसरते. माझा हात आपोआपच पुस्तकाकडे जातो. त्यानंतर अर्धा तास मला कशाचीही फिकीर नसते. मी माझ्याच वाचनात दंग असतो. माझ्याभोवती स्वतःचेच असे वेगळे जग तयार होत असते. तशा माझ्याभोवती अनेक जणांच्या अनेक क्रिया चालू असतात. त्या सगळ्यांची चाहूल घेत असतानाही माझे मन मात्र पुस्तकातच असते. मी त्यातील पात्रांविषयी, पात्रांद्वारे व्यक्त होणाऱ्या विचारांविषयी विचार करत असतो. अधिक खोलात जाऊन विचार केल्यास प्रथमत: आपण आणि आपण वाचत असलेले पुस्तक (किंवा आणखी काही) यांच्यात आपोआपच एक प्रकारचा बंध तयार होऊ लागतो. आणि त्यानंतर त्यातील पात्रांशी आपली ओळख होऊ लागते. इथपर्यंत वाचनाच्या क्रियेत मनाचा सहभाग असतो. आणि मग त्या विशिष्ट पातळीनंतर आपली बुद्धी काम करू लागते. पात्रांच्या रूपातून व्यक्त झालेल्या विचारांचे आपल्या बुद्धीद्वारे विश्लेषण होऊन पुस्तकांविषयी, त्यातील विषयाविषयी आपले मत तयार होते. त्यानंतरच वाचनाची क्रिया पूर्ण होते.

आता माझ्या संदर्भात साहित्याचा विचार करायचा झाल्यास आमच्या घरात वाचनाची, विचारांची कोणतीही पार्श्वभूमी नाही. एका सर्वसामान्य मध्यमवर्गीय कुटुंबाप्रमाणे आमचेही घर आहे. मग मला हा वाचनाचा नाद कसा लागला असावा याचा विचार करता मन भूतकाळात जाते. माझ्या लहानपणी आमच्या शेजाऱ्यांकडे येणाऱ्या वर्तमानपत्रातील रविवारच्या पुरवणीमध्ये मुलांना चित्रे रंगवण्यास दिलेली असायची. त्याची कात्रणे कापून चित्रे रंगविताना त्याच्या मागील बाजूस लिहिलेला मजकूर माझ्या नजरेस पडत असे. अक्षर, शब्द, वाक्ये यांची ओळख नुकतीच झालेली असल्यामुळे मी तो मजकूर वाचायचा प्रयत्न करायचो. असे करता करता काही काळानंतर मला तो बऱ्यापैकी सफाईने वाचता येऊ लागला. पुढे मात्र तेवढ्याश्या मजकुराने माझे समाधान होईना. मग मी लहान मुलांसाठी असलेले आख्खे पानच शेजाऱ्यांकडून आणायला सुरुवात केली आणि मला जमेल तसे वाचायला लागलो. त्याचवेळेस वाचनाची गोडी लागण्यास सुरुवात झाली होती. आणि मागे उल्लेखलेल्या वाचनाच्या पहिल्या टप्प्याची सुरुवात होऊन साहित्याशी ओळख होत होती.

माझ्या या वाचनाच्या वेडाबद्दल सुरुवातीला घरच्यांना कौतुक होते. पण म्हणून त्यांनी माझ्या वाचनाला प्रोत्साहन देणे, त्याला जाणीवपूर्वक विशिष्ट वळण लावणे अशी कामे कधीही केली नाहीत. कारण त्यावेळी आम्हाला कोणालाही वाचनाच्या एकूणच आवाक्याचा अंदाज नव्हता. आणि त्याचा परिणाम असा झाला की मी जे काही हाताला लागेल ते वाचत गेलो आणि मला जमेल तसा अन्वयार्थ लावत गेलो.

हाच मुद्दा पुढे घेऊन जायचे झाल्यास आपल्याला असे म्हणता येईल की, आपल्या मुलांना लहान वयापासूनच वाचनाची सवय लागावी म्हणून पालक आवर्जून प्रयत्न करताना दिसतात. पण तसा प्रयत्न करताना त्यांच्या नकळत (किंवा जाणीवपूर्वकही) पालकांचा स्वत:चा वाचनाबाबतचा दृष्टिकोन मुलांवर लादला जाण्याची शक्यता असते. असे न करता मुलांच्या भावविश्वातील लोकांनी त्यांना विविध विषयांच्या साहित्याची मुबलक उपलब्धता करून दिली पाहिजे. त्यातून मुले त्यांना जे पाहिजे ते स्वीकारतील. पण ही निवड करताना जर मुलांना मदतीची गरज भासली तर तीही दिली पाहिजे. यातूनच संवादालाही चालना मिळेल.

याच दरम्यान मला ग्रंथालय नामक अलिबाबाच्या गुहेची ओळख झाली. आमचे शिक्षक आम्हा मुलांना ग्रंथालयात नेऊन पुस्तकातील गोष्टी वाचून दाखवायचे. स्वतः पुस्तक घ्यायला प्रवृत्त करायचे. त्यातूनच माझ्या वाचनात छोटी छोटी गोष्टींची पुस्तके आली. तेनाली रामन, अरेबियन नाईट्स, इसापनीतीच्या गोष्टी अश्यांसारख्या पुस्तकांतून माझ्या वाचनाचा पाया विस्तारण्यास मदत झाली असावी. त्याचबरोबर समाजात सर्वसाधारणपणे अपेक्षित असलेल्या 'बेसिक' मूल्यांची ओळख झाली. ग्रंथालयातून पुस्तके घरी येऊ लागली. शाळेतही फावल्या वेळेत पुस्तकवाचन आता माझा छंद झाला. या सर्व वाचनातूनच एका क्षणी असे वाटले की आता आपल्याजवळही सांगण्यासारखे काहीतरी आहे. आता आपणही व्यक्त झाले पाहिजे. याच भावनेतूनच मी शाळेच्या वार्षिकासाठी माझी कथा लिहिली. अर्थात त्यात कथागुण फारसे नसले तरी निर्मितीचा आनंद मात्र मोठा होता. आणि वाचनातून लिखाण व लिखाणातून वाचन या चक्राला सुरुवात झाली. यात एक मुद्दा सांगावासा वाटतो तो म्हणजे लहान वयात इतर मुलांप्रमाणेच

माझ्याही वाचनात परीकथा, जादूच्या कथा आल्या. पण त्यांचा माझ्यावर विरुद्ध प्रभाव पडला. म्हणजे, त्या गोष्टींतील काल्पनिक जग आणि वास्तव यातील अंतर मी अनुभवत होतो. त्यामुळेच रोजच्या आयुष्यात पऱ्या, भूत, जादूगार असे काही नसते या भावनेतून मी वास्तववादाशी अधिकच बांधला गेलो. माझ्या वाचनाचा दुसरा परिणाम असा झाला की, वर्गातील प्रश्नांची उत्तरे देण्यात, शिक्षकांशी संभाषण करण्यात मी कायमच पुढे असायचो. यातून माझी स्वत:ची अस्मिता आकाराला येत होती.

इकडे आमचे घर, माझ्या आजूबाजूचे वातावरण यावरही माझ्या वाचनाचा प्रभाव पडत होता. माझ्या घरच्यांनी आता माझ्या वाचनाकडे लक्ष देण्यास सुरुवात केली व ते मला पुस्तके, मासिके पुरवू लागले. याच काळात आमच्या घरात एक छोटासा बदल घडला तो म्हणजे माझ्या आईला वर्तमानपत्र चाळायची सवय लागली. (अर्थात जेव्हा त्या गोष्टीचे महत्त्व कळले नव्हते ते आता कळते आहे.) साहित्याच्या ताकदीचा अंदाज यायला अजून एक गोष्ट घडली ती म्हणजे शाळेच्या वार्षिक प्रकल्पनिमित्ताने कविता, माहितीपर लेख लिहिले जायचे. त्यात मी वर्ग-मित्र मैत्रिणींना सुधारणा सुचवायचो(?) आणि ते करताना सातव्या आसमानावर पोहचायचो.

शाळा, घर, वाचन, अभ्यास यात दिवस चालले होते. हे सगळे चालू असताना मला एक गोष्ट जाणवली की वाचन, साहित्य ही फावल्या वेळी करण्याची गोष्ट नसून ती गंभीरपणे करायची गोष्ट आहे. आणि त्याचबरोबर आपल्याकडे काहीतरी वेगळा ठेवा तयार होतो आहे हेही जाणवले. याच काळात समाजव्यवस्था म्हणजे काय हे कळू लागले. अर्थात त्यावेळी फक्त हेच जाणवत होते की आपण आता अधिकाधिक वाचले पाहिजे आणि वाचन कक्षा रुंदावली पाहिजे.

माझ्या वाचनाच्या या प्रवासात माझा किशोर कथा या प्रकाराशी संपर्क आला. या प्रकारातील फास्टर फेणे, गोट्या वगैरे वाचले. त्यानंतर माझ्या एक गोष्ट लक्षात आली की आपल्या मातीतील समकालीन बालवाङ्मयाची खूपच कमतरता आहे. आत्ताच्या मुलांच्या भावविश्वाशी संबंधित असे वाङ्मय निर्माण केले जावे असे मला वाटते.

यानंतर खऱ्या अर्थाने प्रौढ साहित्याकडे माझा प्रवास सुरू झाला. आम्हाला अभ्यासासाठी असलेल्या द.मा. मिरासदार यांच्या 'गाणारा मुलुख' या नाटकातील एका उताऱ्यापासून माझी त्यांच्या कथांशी ओळख झाली. त्यांच्या पुस्तकातील विस्तार होऊन तो परीघ पुढे शंकर पाटील, व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथांपर्यंत विस्तारला. द.मा. मिरासदार व शंकर पाटील यांच्या बहुतेक कथा विनोदी अंगाने जाणाऱ्या असल्या तरी विशेषतः द.मा. मिरासदार यांच्या कथांतून ग्रामीण जनतेच्या दारिद्र्य, अज्ञान, निरक्षरता यांची ओळख होते. पण तरीही त्या कथा अंगावर येत नाहीत. दुसऱ्या बाजूला व्यंकटेश माडगूळकर यांच्या 'माणदेशी माणसं' मध्ये ग्रामीण गोष्टींचे भेदक करूण चित्र येते. हे वाचत असतानाच व्यवस्थेतील विषमता जाणवत गेली आणि कुठेतरी काहीतरी चुकते आहे या भावनेने जन्म घेतला.

विनोदाच्या बाबतीत बोलायचे झाल्यास द. मा. मिरासदार यांचा विनोद ग्रामीण तर पु. ल. देशपांडे, गंगाधर गाडगीळ यांचा विनोद शहरी मध्यमवर्गीय असल्याचे जाणवले आणि या दोन्ही शैलींमधील फरक कळला.

माझ्या वाचनात त्यावेळी 'तोत्तोचान' नावाचे पुस्तक आले. हे मूळ जपानी पुस्तक होते. आणि शिक्षणासंदर्भात एक वेगळा विचार त्यात मांडला होता. (त्यावेळेस रेल्वेच्या डब्यातील शाळा हा प्रकार वेगळाच वाटला होता.) पुस्तकातील शेवटच्या द्वितीय महायुद्धकालीन प्रसंगाच्या वर्णनाने मी हलून गेलो होतो.

हे सर्व चालू असतानाच मला अचानक लिखाणाची उर्मी आल्यास मी वहीवर, तावावर, कुठेही अर्धवट कथा लिहू लागलो. या कथांतूनच पुढे गंभीर, प्रौढ लेखनाची सुरुवात झाली.

या पार्श्वभूमीवर एक मुद्दा सांगावासा वाटतो तो म्हणजे एकदा का तुमच्या बुद्धीला सकस खाद्य मिळण्याची सवय झाली की मग वाचन पुस्तकांपुरते सीमित न राहाता वाचनासाठी वर्तमानपत्रातले संपादकीय, मासिके, पाक्षिके असे काहीही चालते. या सर्व माध्यमांमध्ये वर्तमानाचे विश्लेषण होत असते. काळ थिजून न जाता काळाचा प्रभाव चालू राहतो आणि आपण वर्तमानाशी बांधले जातो. ही सर्व माध्यमे म्हणजे त्या-त्या काळाचे आलेख असतात, ज्यांचा आपल्याला भविष्यातही उपयोग होतो. (माझ्याकडे बरीचशी जुनी संपादकीये संग्रही आहेत.) या सर्व प्रवासात माझ्या नकळत मी वाचलेल्या गोष्टींवर चिंतन करू लागलो. माझी समाजाकडे बघण्याची स्वतःची दृष्टी विकसित होऊ लागली.

याच काळात माझ्या वाचनात 'महानायक' आणि 'सेतू' ही पुस्तके आली. महानायकच्या निमित्ताने मला जागतिक राजकारणाचा परीघ कळला, स्वातंत्र्यपूर्व काळातील आपल्या देशातील दोन भिन्न प्रकारच्या विचारधारा कळल्या, तर सेतूमधून स्त्री-पुरुष समानता, भारतीय समाजातील स्त्रीचे स्थान, नात्यांतील ताण-तणाव यांचे दर्शन घडले.

हे सर्व घडत असतानाच प्रत्येक तरुण-तरुणीच्या आयुष्यात येणारा लैंगिकतेचा टप्पा माझ्या आयुष्यात आला. पण आतापर्यंतच्या वाचनाने स्त्री-पुरुष समानता, स्त्रीचे व्यक्ती म्हणून असणारे स्थान या मूल्यांची रुजवण माझ्यात झाली असल्याने माझ्या लैंगिक भावना कधीही भरकटलेल्या नाहीत. (अर्थात याला शाळेतील वातावरणदेखील कारणीभूत होते.) याच दरम्यान मला शाळेच्या स्थापनेमागचा विचारही कळला. त्यातून मी या शिक्षणविषयक विचारांशी जोडला गेलो.

हळूहळू माझा शालेय जीवनातील रोमहर्षक कालखंड संपला. आता मला शालेय जीवनातील विचारांच्या छायेतून बाहेर पडून समाजाकडे बघण्याची संधी मिळणार होती. आणि इथेच आतापर्यंतच्या माझ्या वाचनाची आणि आकलनशक्तीची परीक्षा होणार होती. कारण आजूबाजूच्या शिक्षणव्यवस्थेचा दर्जा काही फार चांगला नव्हता. त्या व्यवस्थेला मी स्वीकारू शकलो नाही. आणि

(पान १४ वर)

# वाचनाची गोष्ट - यशवंत देशमुख



यशवंत देशमुख हे व्यावसायिक चित्रकार आहेत. त्यांचे शिक्षण मुंबईतील जे जे स्कूल ऑफ आर्ट्‌स् येथे झाले. १९८६ पासून देशभरात त्यांची अनेक चित्र-प्रदर्शने आयोजित झालेली आहेत. १९९३ मध्ये त्यांना बॉम्बे आर्ट सोसायटीतर्फे दर वर्षी दिली जाणारी प्रतिष्ठित बेंद्रे-हुसेन स्कॉलरशिप मिळाली. कला क्षेत्रातील इतरही अनेक पुरस्कार त्यांना मिळाले आहेत.

तिसरी चौथीत शिकत असतानाची गोष्ट. अकोल्याला असतानाची. लहानपण तिथंच गेलं माझं. शाळेला उन्हाळी सुट्या पडल्यावर काही शाळकरी मुलं छोटी छोटी वाचनालयं सुरू करायची. रस्त्यालगतच्या किंवा घराच्या ओटीवर, तर कधी रस्त्यावर चटई टाकून पुस्तकं ओळीत मांडून बसायची. नावनोंदणीसाठी एक वही. पहिल्या पानावर वाचनालयाला दिलेलं नाव, गणेश वाचनालय वगैरे. खाली वेळ, तारीख व पत्त्याचा तपशील. हवं असलेलं पुस्तक दर दिवसाच्या भाड्यावर मिळायचं. वहीत तो नावनोंदणी करणार. ओळख नसेल तर, कुठे राहतो याची खाणाखुणांसहित माहिती. ग्राहक मुख्यतः विद्यार्थी असल्यामुळे डिपॉझिटचा प्रश्न नसायचा. दोन तीन दिवसात पुस्तक परत नाही केलं तर पुस्तकवाली मुलं घर शोधत यायची व दिवसाला पाच पैसे भाडं व पुस्तक घेऊन जायची. अशांना परत तिथून पुस्तक मिळण्याची शक्यता कमी. पण असं कमी प्रमाणात घडत असावं. या वाचनालयांमध्ये मुख्यतः जादूची घंटा, शापित राजकुमारसारखी पऱ्या राक्षसांच्या गोष्टींची पुस्तकं असायची. पंधरा वीस पानांच्या या पुस्तकांची छापील किंमत तीस ते चाळीस पैसे होती.


माझ्या घरात वाचनाची अशी आवड कोणाला नव्हती. खाऊसाठीचे किंवा आईकडे तगादा लावून मिळालेले पैसे असायचे. इतर मित्रांबरोबर पुस्तकांची अदलाबदलसुद्धा व्हायची. एकंदरीत चार-पाच दिवसात एक वाचनालय वाचून काढायचं. बऱ्याचवेळा वाचनालयांमध्ये तीच ती पुस्तकं असायची. मग गल्लोगल्ली फिरून नवीन पुस्तकाचा शोध. खूप दूरवर राहणाऱ्यांना सहसा पुस्तकं मिळायची नाहीत. तेव्हा जवळपासचा खोटा पत्ता सांगून पुस्तकं मिळवायचो. पुस्तकातील गोष्टी थोड्याफार फरकाने सारख्या असायच्या. रात्री मित्रांसोबत बंद दुकानासमोरच्या ओटीवर आम्ही गप्पा मारत बसायचो. या ग्रूपमध्ये पुस्तकं वाचणारं कोणी नव्हतं. काहीजण वडिलांसोबत दुकानात काम करणारे होते. यांना गोष्टी सांगायचं काम माझं असायचं. कधीकधी वाचलेल्या दोन-तीन गोष्टी एकत्र करून मी त्यांना सांगायचो. कधी स्वतःच्या कल्पनासुद्धा घुसवून द्यायचो. त्यांना तर्कहीन वाटलं तर प्रतिप्रश्न असायचा. पण हे चालून जायचं. एकटा असताना मी स्वतः गोष्टी रचायला लागलो. लवकरच या प्रकारच्या गोष्टींचा मला कंटाळा यायला लागला.

सुटीत काही दिवस मी मावशीच्या गावी होतो. शिरपूरला. मावशी मुलींच्या शाळेत मुख्याध्यापिका होती. त्या छोट्या गावात मी ग्रामपंचायतीच्या वाचनालयातून पुस्तकं वाचायला आणायचो. रात्री झोपताना मावशी विचारायची, आज काय वाचलं? वाचलेली कथा मग तिला थोडक्यात सांगायचो. एकदा सानेगुरुजींची 'रामाचा शेला' ही कादंबरी वाचली. त्यात नायक नायिकेचं प्रेम असतं हे सांगताना मला खूप लाज वाटल्याचं आठवतं. मावशीकडे प्रौढ शिक्षणासंबंधी पुस्तिका होत्या. त्यात लैंगिकता शिक्षणाबद्दल आकृत्यांसहित माहिती होती. मावशीच्या चोरून ती पुस्तिका मी बऱ्याच वेळा वाचली होती. पाचवीत असताना मला 'तोता-मैना' नावाचा कथासंग्रह मिळाला. त्यात प्रणयाची ओझरती वर्णनं होती. त्यातलं वेगळं मनोरंजन मला जाणवलं आणि लक्षात देखील राहिलं.

आमच्या वाड्यात माझ्या मित्राचा मोठा भाऊ कॉलेजला शिकत होता. नाव शाऊभाऊ (शाहू). त्याच्याकडे हिंदीतली दिल्ली पॉकेटबुक्सची जाडजूड पुस्तकं होती. मी तेव्हा सातवी आठवीत असेन. भाभी की चूडियाँ, सौतन, विक्रांत और चिनी हसीना असले उपन्यास होते. रात्री उशिरापर्यंत मी ती पुस्तकं वाचत असे. ताणामुळे डोळ्यात पाणी यायचं. शाऊभाऊकडची सगळी पुस्तकं वाचून झाली. नवीन पुस्तक आणलं की तो आवर्जून सांगायचा. इतर कुठला संवाद त्याच्याशी नव्हता. ही पुस्तकं वाचताना एखादा हिंदी सिनेमा बघत असल्यासारखं वाटायचं. समर्पणाचा अतिरेक, एककल्ली व्यक्तिचित्रणाचं बेगडी स्वरूप यात असायचं. तेव्हा मला हे उमगत नव्हतं. त्याच प्रकारचा उपन्यास एकदा वाचत होतो. त्या लेखकाने या हिंदी उपन्यास विश्वाची खिल्ली उडवलेली होती. यातील कथानकांच्या बटबटीतपणाबद्दल, काल्पनिक भावविश्वाबद्दल आणि याप्रकारच्या लेखनव्यवसायाबद्दल तिरकसपणे लिहिलेलं होतं. 'अरे, हो ! हे खरं आहे!' असा लख्ख प्रकाश माझ्या डोक्यात त्यावेळी पडला. त्यानंतर मी ही पुस्तकं वाचायचं बंद केलं असं नाही, तर कोणाकडून ही पुस्तकं मिळेनाशी झाली म्हणून बंद झालं. हे सगळं समजण्याचं वयपण नव्हतं.

वाड्यातलाच आणखी एक मित्र गोविंदा. त्याला चार मोठी भावंडं होती. त्यांची पुस्तकं बदलून आणायला कधी कधी तो मला वाचनालयात न्यायचा. टोपले वाचनालय म्हणून एक व्यावसायिक वाचनालय होतं. तिथे पुस्तकाचं भाडं पंधरा पैसे. त्याच प्रमाणात डिपॉझिट. गोविंदामुळे मला पुस्तकं वाचायला मिळायची. यात गुरुनाथ नाईक यांच्या नाईट किंग, लक्षवेधी अशा नायकांच्या कथा असायच्या. बाबुराव अर्नाळकरांच्या कादंबऱ्यापण वाचल्याचं आठवतं. यात शहरी वातावरणातल्या हेरकथा किंवा भुताटकीच्या गूढकथा असायच्या. एकंदरीत हेरकथा वाचायचा छंद मला लागला, त्यातली रहस्यं, गूढता मला आवडू लागली. गोविंदाच्या भावानंदेखील एक हेरकथा लिहिली आहे आणि त्याचा प्रकाशकांशी पत्रव्यवहार सुरू आहे असं त्यानं मला सांगितलं. आपणही कथा लिहाव्यात असं मला वाटायचं. त्या काळात एकदा प्रयत्नही करून बघितला. नंतर हेही वाचन थांबलं.

मी राहात असलेली जागा, माझी घरची माणसं, मित्र, माझी



शाळा, माझे खेळ यापेक्षा माझं वाचनाचं जग अगदी वेगळं होतं. त्याबद्दल कोणाशी बोलण्याची वेळ आली नाही. चित्रं काढण्याचं वेड पण तेवढंच होतं. मी खूप चित्रं रंगवायचो. सगळी चित्रं घरात भिंतीवर ओळीत चिकटवून ठेवायचो. अंधाऱ्या खोलीमुळे मी ओसरीत चित्रं काढत असे. एखाद्या दिवशी मी पूर्ण दिवस चित्रं रंगवायचो. वाड्यातील लहानमोठे जाता-येता किती रंगवून झालं ते बघून जायचे. नको तेवढं माझं कौतुक. मी चित्रं काढतो हे सगळ्यांना माहीत होतं, पण वाचनाचं विश्व फक्त माझंच होतं.

नववीत असताना आमचं घर बदललं. माझा शाळकरी जुना मित्र जवळच राहायचा. सदाशिव. आम्ही दोघं नियमित वाचनालयात जायचो. त्याच्याकडे सायकल होती. ‘बाबुजी देशमुख वाचनालय’ हे अकोल्यात अगदी मध्यवर्ती ठिकाणी असलेलं भलंमोठं वाचनालय होतं. आजही आहे. तिथे मासिकं, साप्ताहिकं, वर्तमानपत्रं वाचण्याची सोय होती आणि घरी पुस्तकं नेऊन वाचण्यासाठी ग्रंथालयसुद्धा. वाचनालयात प्रवेश मुफ्त. अगदी स्टारडस्टपासून बळीराजा, अमृत, चांदोबापर्यंत. धार्मिक मासिकंसुद्धा. चित्रं काढायच्या छंदामुळे इथल्या मासिकातील नट नट्यांची चित्रं फाडून नेण्याचा प्रमाद माझ्याकडून खूपदा घडला आहे. या ग्रंथालयातून मी पुस्तकं घरी आणून वाचायला लागलो. आधी वाचलेल्या पुस्तकांपेक्षा इथली पुस्तकं वेगळी होती. शिरवाडकर, खांडेकर, हरी नारायण आपटे, तेंडुलकर यासारख्या साहित्यिकांची पुस्तकं होती. अनुवादित पुस्तकं होती. ग्रामीण साहित्याचा, कविता संग्रहाचा वेगळा खण होता. बाजीराव पाटील यांच्या कथा किंवा विठ्ठल वाघांचा कविता संग्रह अशा स्थानिक साहित्यिकांची पुस्तकं बघून अभिमान वाटायचा. पाठची पुढची पानं नसलेली सुंदर पुस्तकं वाचलीत त्यांची आजही नावं कळली नाहीत. याच काळात चरित्रं, आत्मचरित्रंही खूप वाचली. एकदा मित्राच्या आईला बहिणाबाईच्या कविता वाचून दाखवल्या. यावर तिनं शेतावरची, बायकांसोबत गायची गाणी गायली. माहेरच्या आठवणींची गाणी तिनं तासभर तरी गायली असावीत. तिच्या डोळ्यात आसवांच्या धारा होत्या आणि आमची मनं भरून गच्च झाली होती.

कवितेपासूनची सगळीच पुस्तकं मला जवळची वाटू लागली. पुस्तकांशी संवाद व्हायला लागला. समीक्षात्मक ग्रंथ, मुलाखती वाचताना इतर पुस्तकांचे उल्लेख सापडायचे. त्यांची विशेषता त्यात सांगितलेली असायची. मग ती पुस्तकं मिळवण्याचा मी प्रयत्न करत असे. एकातून दुसरी अशी पुस्तकांची माहिती वाढत गेली.

हळूहळू काय वाचायचं, काय नाही याचा अंदाज येत गेला.

**यशवंत देशमुख**
deshmukh.yashwant@gmail.com
9869212439



# प्रवास... – कल्पिता दंडवते



कल्पिता दंडवते या कमला निंबकर बालभवन येथे गेली २१ वर्षे भाषा, पर्यावरण व कला शिक्षिका म्हणून काम करत आहेत. पाठ्यपुस्तकाच्या बाहेर जाऊन मुलांनी निसर्ग, इतर पुस्तके, चित्रे यांच्या माध्यमातून शिकावे यासाठी त्या प्रयत्नशील असतात.

मी इयत्ता आठवीला मराठी शिकवते. पाठ्यपुस्तकात 'माझा रशियाचा प्रवास' आणि 'अंदमान' हे दोन पाठ आहेत. पाठाची ओळख करून घेताना मी विचारले, ''कोणी प्रवास कशासाठी करतं?'' 'आनंद मिळावा म्हणून', 'विरंगुळा म्हणून', 'व्यापारासाठी', 'उदरनिर्वाहासाठी', 'अभ्यासासाठी', 'पत्रकारितेसाठी', 'फोटोग्राफीसाठी', 'चालक म्हणून', 'गाईड म्हणून'... वगैरे उत्तरे आली. यातूनच 'प्रवास' असा प्रकल्प करूयात असे ठरले. हा प्रकल्प करताना मुलांनी प्रवासासंबंधी पुस्तके वाचायची, परीक्षण करायचे, त्यासंबंधित संदर्भ शोधून वर्गासमोर पावरपॉइंट प्रेझेन्टेशन करायचे आणि शेवटी पुस्तकातील स्वतःला आवडलेला एक मोठासा भाग सर्वांना वाचून दाखवायचा, असा प्रकल्पाचा सर्वसाधारण आराखडा ठरला.

मुले जेव्हा कामाला लागली तेव्हा त्यांनी सुरुवातीला केवळ 'पूर्वरंग', 'दक्षिणरंग', 'अमेरिका', 'नायगाराचे नादब्रम्ह', 'वंगचित्रे' आदी देशांतर्गत अथवा देशाबाहेरची प्रवासवर्णने वाचायला घेतली. काही मुलांना भावला निसर्गप्रवास. त्यांनी 'सायबेरियन क्रौंच', 'केनियाच्या सफारी', 'सिंहांच्या देशात' इत्यादी पुस्तके निवडली.

सायबेरियन क्रौंच या अतिशय लोभस, देखण्या, नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या पक्ष्याचा मागोवा घेताना भारत, अमेरिका व रशियातील पक्षितज्ज्ञांनी केलेल्या अथक प्रयत्नांची प्रकाश गोळे यांनी केलेली टिपणे प्रवासवर्णन रूपात पाहिली ती ओंकार मगरने. हा प्रवास आहे क्रौंचांच्या कृत्रिम पालनाचा. क्रौंचाची एक जोडी दोन अंडी घालते. त्यातील एकाच अंड्यातून पिलू बाहेर पडते. दुसरे अंडे कृत्रिमरीत्या उबवून त्या पिलाचे स्वतंत्र होईपर्यंत संगोपन करणे व शेवटी त्याला रेडिओ ट्रान्समीटर बसवून मुक्त करण्याचा रोमहर्षक प्रवास या पुस्तकात आहे. दिल्ली – मॉस्को – सालेखार्द – सायबेरिया ही शहरे, त्यांची संस्कृती, अर्थव्यवस्था, इत्यादी या प्रकल्पाच्या निमित्ताने अभ्यासायला मिळाली असे ओंकार नोंदवतो. क्रौंचांच्या कृत्रिमरित्या पालनाची कल्पना त्याला भारून टाकते. पुस्तकाच्या शेवटी साशा व युरी वन्य क्रौंच पिलांच्या पाठीवर ट्रान्समीटर बांधण्यात यशस्वी होतात व ''प्रकाश, वी आर सक्सेसफुल!'' हे साशा या शास्त्रज्ञाचे आनंदमयी ओरडणे ऐकून लेखक धावत जाऊन सर्वांचे अभिनंदन करतात तेव्हा या रोमहर्षक प्रवासाचा शेवट होतो, असे ओंकार म्हणतो.

हत्तींची आवड असणाऱ्या गौरवने एका मनस्वी मुलाच्या आपली करिअर, आपले आयुष्याचे ध्येय शोधण्याच्या प्रवासाचे 'एका रानवेड्याची शोधयात्रा' हे पुस्तक निवडले. पुस्तक निवडीविषयी लिहिताना गौरव म्हणतो– ''मला लहानपणापासूनच हत्तींना पाहायला, हत्तींवर बसायला आवडायचे. या पुस्तकावरचे बलाढ्य हत्तीचे चित्र पाहून यामध्ये हत्तीविषयी चांगली माहिती असणार म्हणून मी हे पुस्तक वाचायला घेतले. शिवाय पुस्तकाच्या नावातच यात्रा आहे तेव्हा या पुस्तकाचे वाचन या प्रकल्पात योग्य होईल असे वाटले.'' हत्ती स्थलांतर का करतात, त्यावेळी त्यांना कोणत्या अडचणी येतात, त्यांच्या कत्तली इत्यादीबद्दल नवी माहिती तर गौरवला मिळालीच पण निसर्गासाठी झोकून देऊन काम करणाऱ्या वेड्या लोकांचीही ओळख झाली. तो म्हणतो, ''मदुमलाईच्या घनदाट जंगलात हत्तींचे शेण गोळा करायचे आणि त्यांच्या सुळ्यांची लांबी मोजायचे काम करता करता कृष्णमेघ कुंटे यांनी जंगलात स्वतःला मुरवून घेतले. ते जंगलात वेड्यासारखे फिरले म्हणून 'रानवेडा' असे नाव दिले असेल असे मला वाटते.''

सोनालीने 'सिल्व्हर स्टार' हा एका जहाजाचा प्रवास प्रकल्पासाठी निवडला. वास्तविक जहाज हे प्रवास घडवून आणणारे एक निर्जीव साधन आहे. परंतु या पुस्तकात सिल्व्हर स्टार ही निर्जीव गोष्ट न वाटता जहाजावर घडणाऱ्या विविध प्रसंगातून जिवंतपणे समोर येते. प्रवासाला निघण्याआधीची तयारी, जहाजावरचे कायदेकानू, सहप्रवासी असणाऱ्या माणसा–माणसातील आंतरक्रिया आपल्याला पाहायला मिळतात. ''या प्रवासात काही चांगले खलाशी भेटतात त्यांची इतकी सवय होते की ते मरण पावल्यावर अक्षरशः रडण्याची गत होते,'' अशी कबुली सोनाली देते.


ऐतिहासिक प्रवासवर्णने असणारी पुस्तके काहींनी निवडली. 'कथा ही दिवा वादळाची' या पुस्तकात स्वातंत्र्य संग्रामातील क्रांतिकारकांचा प्रवास रेखाटला आहे. 'तृष्णाई' हा लष्कर आणि भूदलाच्या १० इंजिनिअर्सनी केलेला समुद्र प्रवास, 'सेसना' हा छोट्या विमानाने केलेला प्रवास असे साहसी प्रवासही काही मुलांनी वाचायला घेतले. 'अंतराळात माणूस' तसेच अंतराळातील एका प्रोबचा प्रवास दाखवणारे 'अभयारण्य' अशा विज्ञान कादंबऱ्याही मुलांनी शोधल्या.

आयुष्याचा प्रवास दाखवणाऱ्या 'प्रकाशवाटा' मध्ये अचानक प्रसंगाने आयुष्याला कलाटणी मिळाल्यावर डॉ. प्रकाश आमटे यांनी केलेले आदिवासींच्यासाठीचे कार्य, आदिवासींची पिळवणूक थांबवून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याची धडपड पाहायला मिळते. ''नवीन विचारांच्या, स्वतःला झोकून देऊन काम करणाऱ्या तरुणांची आज देशाला गरज आहे. केवळ मानवजातीच्या प्रेमाखातर ते

झगडले नाहीत तर जंगलातील अनाथ प्राण्यांचे पालकही ते बनले,'' असे ओंकार गायकवाड लिहितो.

घरातून पळून आलेल्या, जीवनाशी झगडणाऱ्या मुलांचा 'प्लॅटफॉर्म नंबर झीरो' वर थांबलेला प्रवास सांगताना स्नेहा म्हणते, ''अस्थिर आयुष्याला तोंड देऊन भविष्याच्या आशेने घर सोडतात मुले. पण त्यांच्या वाट्याला काय येते, ते या पुस्तकात लिहिले आहे. आजारी धाकट्या भावासाठी आत्याच्या घरातून हजार रुपये चोरलेल्या अॅन्थनीवर घर सोडण्याची वेळ येते. रेल्वे प्लॅटफॉर्मवर अशी अनेक मुले राहतात. अशा मुलांचे होणारे शोषण, छोट्या मोठ्या घटनांसाठी दिली जाणारी अमानुष वागणूक, मारहाण यामध्ये





एखाद्या सरकारी अधिकाऱ्यापासून ते सर्वसामान्य माणसापर्यंत सगळ्यांचा समावेश असतो. मुलांना शिक्षणाचा, विकासाचा हक्क मिळवून देण्यात यंत्रणा अपयशी ठरते आहे, तसेच जगण्याच्या, सुरक्षेच्या हक्काचीही पायमल्ली होताना वाचणाऱ्याच्या डोळ्यात पाणी येते.'' या मुलांचा कल्पनातीत ताणाखाली होणारा सारा प्रवास स्नेहाने अनुभवला.

'शौझिया' या पुस्तकाबद्दल लिहिताना निरंजन म्हणतो, ''बारा वर्षांच्या मुलीचा अफगाणी छावणीतून फ्रान्सपर्यंत पोहोचण्याच्या स्वप्नाची वाताहत दाखवणारा प्रवास आहे. निर्वासित छावण्यांमधील मुलांचे जीवन किड्यामुंग्यासारखे होते. यातूनही शौझियाने स्वतःला वाचविण्यासाठी केस कापले आणि मुलाच्या पोशाखात वावरू लागली. स्वाभिमानी अफगाण नागरिकांच्या झुंडीच्या झुंडी देशाबाहेर पडल्याने, निर्वासिताचे जिणे नको, असे वाटून शौझिया कशी बाहेर पडली आणि तिने कसा प्रवास केला, त्याची ही गोष्ट आहे.''

मातृत्व, जिद्द, साहस यांनी भरलेला प्रवास म्हणजे 'नॉट विदाऊट माय डॉटर'. इराणमधून लपून छपून, जीवाचा धोका पत्करून सुटका करून घेणे ही एक खूप धाडसी मोहीम बेट्टी महमूदीने आपल्या मुलगी माहतोबबरोबर जिवाच्या कराराने पार पाडली. तिचा रोमहर्षक प्रवास अनिकेतने आपल्या प्रकल्पासाठी निवडला. तो नुसता पुस्तक वाचूनच राहिला नाही तर त्याने जगाच्या नकाशात त्या थरारक प्रवासाचा मार्ग दाखवला आहे. इंटरनेटच्या साहाय्याने बेट्टी महमूदी, माहतोब यांचे फोटो, पुस्तकातील इराणी शब्दांचे मराठी भाषांतर, इराणी पोशाख, यांबद्दल माहिती मिळवून त्याने ती प्रकल्पात मांडली. पुस्तकाचे मुखपृष्ठही त्याने जसेच्या तसे रेखाटून आपल्या प्रकल्पासाठी वापरले.

१० वी नंतर 'शाळेपासून मुक्ती वर्षापुरती' हे राहुल अल्वारिस यांनी लिहिलेले पुस्तक. हा एक वर्षाचा प्रवास सलोनीने आपल्या प्रकल्पासाठी निवडला. ती लिहिते, ''दहावी झाल्यानंतर त्याला शाळेच्या शिकण्याचा कंटाळा आला होता. या सगळ्यातून बाहेर पडून त्याने वर्षभर सुट्टी घेऊन वेगवेगळ्या गोष्टी करायच्या असे ठरवले. १९९५-९६ हे वर्ष त्याने वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन भेटी देऊन शिक्षण घेतले. वर्षभर केलेल्या प्रवासातून त्याने पुष्कळ काही



शिकून घेतले. आळंबी वाढवणे, शेतीची कामे, मत्स्यालयाचे काम करणे, मगरींची काळजी घेणे, साप पकडणे, अशा गोष्टी शिकताना तसेच प्रवासात झालेल्या फसवणुकीमुळेही राहुल अल्वारिसच्या सामाजिक शिक्षणात भरच पडली.''

अशा प्रकारे मुलांचा हा प्रवासाचा शोध वेगवेगळ्या मार्गांनी पुढे गेला. प्रवास हा फक्त एका ठिकाणहून दुसऱ्या ठिकाणी पोचणे नसून करिअरचा शोध असू शकतो. आपल्या ध्येयापर्यंत पोचण्याचा, शोध लावण्याचा, संकटातून सुटकेकडे जाण्याचा, प्रयोगाच्या संकल्पनेकडून पूर्ततेपर्यंतचा असे अनेक प्रकारचे प्रवास असू शकतात हे मुलांच्या सादरीकरणातून पुढे आले.

सादरीकरणामुळे इतर मुलांना अनेक नवनवीन पुस्तकांबद्दल माहिती मिळाली. प्रत्येक पुस्तकातील एक मोठासा भाग वाचून दाखवल्यामुळे मुलांच्या मनात उत्सुकता निर्माण झाली आणि पुढील वर्षभरात त्यांनी त्यातील अनेक पुस्तके वाचली. अशा रीतीने जवळजवळ महिनाभर चाललेल्या या प्रकल्पात दोन धड्यांऐवजी २८ पुस्तकांची मुलांना ओळख झाली. अनेकांनी इंटरनेटवरून लेखकांबद्दल माहिती काढली. गोष्टी ज्या देशांत घडल्या त्या वेगवेगळ्या देशांची माहिती शोधली. वेगवेगळ्या संस्कृतींचा शोध घेतला. हा प्रकल्प म्हणजे मुलांचा खऱ्या अर्थाने समृद्ध होण्याचा प्रवास होता असेच म्हणता येईल.

**कल्पिता दंडवते**
knd.knb.fltn@gmail.com
9850802810

# स्वनियंत्रण

- नीलिमा गोखले
मंजिरी निंबकर




गेल्या काही दशकांमध्ये अनेक भारतीय परदेशवारी करून आलेले आहेत किंवा टी.व्ही., सिनेमाच्या माध्यमातून त्यांना परदेशाची झलक दिसली आहे. ते सर्वच लोक एका गोष्टीचा आवर्जून उल्लेख करतात. ती म्हणजे तेथील सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता आणि नागरिकांची नियमबद्ध वागणूक. या गोष्टी आपल्या देशातही असाव्यात असे प्रत्येकालाच वाटते. तरीही स्वातंत्र्यानंतर ६७ वर्षे झाली तरी आपल्याला हे शक्य झालेले नाही याचे कारण काय असावे? माझ्या मते याला कारणीभूत आहे स्वनियंत्रणाचा संपूर्ण अभाव.

स्वनियंत्रण म्हणजे आपल्या भावना व विचार आणि त्यातून उद्भवणाऱ्या कृती व वर्तणूक यांच्यावर नियंत्रण असणे. प्रौढ व्यक्ती म्हणून स्वतःवर आणि इतरांवर होणाऱ्या आपल्या वर्तणुकीच्या परिणामांची आपल्याला जाण असली पाहिजे. उदा. आपल्याला एखाद्याचे वागणे अथवा कृती पटली नाही किंवा एखाद्याचा राग आला म्हणून आपण जर शिव्यागाळी वा हाणामारीवर उतरत असू तर ही स्वनियंत्रण नसल्याची खूण आहे. एका स्कूटरस्वाराने टेम्पो चालकाला केलेल्या मारहाणीत तो चालक मृत्युमुखी पडल्याची सत्य घटना आपल्या सर्वांच्या स्मरणात असेलच. भर गर्दीत त्या टेम्पोचा पुसटसा धक्का लागल्याने स्कूटरस्वाराच्या मागे बसलेली त्याची आई घसरून खाली पडली होती. इथे स्कूटर चालकाला ना आपल्या भावनांवर नियंत्रण ठेवता आले ना आपल्या वर्तणुकीवर. परिणाम– टेम्पो चालकाचा जागेवर मृत्यू आणि स्कूटर चालकाला जन्मठेप.

लहान मुले अनेकदा परिणामांचा विचार न करता वागतात. उदा. फक्त आवडणारे पदार्थच खाणे, टी.व्हीवर सारखे आवडते कार्टून पाहात बसणे किंवा आपल्या मनासारखे न झाल्यास सार्वजनिक ठिकाणी अंग टाकून देणे वा किंचाळून त्रागा करणे. जसजशी ती मोठी होतात तसतसे त्यांनी आपल्या अशा उस्फूर्त आणि तीव्र भावनांवर व वर्तनावर नियंत्रण करायला शिकले पाहिजे. आपल्या आजूबाजूच्या लोकांची वर्तणूक पाहून मूल समाजमान्य वागणूक शिकत असते. ते नक्की कसे शिकते हे आपण समजावून घेऊया.

स्वनियंत्रण शिकण्यासाठी तर्कशुद्ध विचार करणे, निर्णय घेणे, आपण घेतलेल्या निर्णयाचे आपल्या स्वतःवर व इतरांवर होणारे परिणाम लक्षात घेऊन मग त्या निर्णयानुसार कृती करणे या सर्व गोष्टी महत्त्वाच्या असतात. स्वनियंत्रणाची प्रक्रिया प्रयत्नपूर्वक जोपासावी लागते. स्वनियंत्रणाचे महत्त्व आणि ते जोपासण्याची प्रक्रिया समजून घेण्यासाठी आपण मुलांना मदत करायला हवी.



स्वनियंत्रणाच्या शिकण्याची सुरुवात बालकाच्या आयुष्यात अगदी लवकर व्हायला हवी. सहाव्या महिन्यापर्यंत बालकाची झोप व दूध पिणे यांचा नित्यक्रम व्यवस्थित बसलेला असतो. आईलाही बालकाच्या संगोपनाच्या कामांची सवय झालेली असते. त्यामुळे हे नित्यक्रम जाणीवपूर्वक दृढ करण्याची हीच योग्य वेळ असते. बालकाला जेव्हा ठराविक वेळेला दूध पाजले जाते, आंघोळ घातली जाते व झोपवले जाते, तेव्हा प्रथम त्याच्या शरीराला या नित्यक्रमाची सवय होऊ लागते व नंतर आता जेवायची वेळ झाली, आता झोपायची वेळ झाली याची जाणीव होऊ लागते. अशा प्रकारे

बाहेरून लादलेल्या दिनक्रमाची बालकाच्या शरीराला हळू हळू सवय होऊ लागते. मात्र अत्यंत जाणीवपूर्वक, अगदी कठोरपणे म्हटले तरी चालेल, बालपणीच हा दिनक्रम प्रस्थापित करणे कळीचे आहे. पालकांनी मुलांशी संवाद करीत पण ठामपणे व धीराने हे काम केले पाहिजे. मी धीराने' किंवा कठोरपणे' हे शब्द वापरते आहे कारण मुले त्या वयात करीत असलेल्या सर्व गोष्टी उस्फूर्त असतात. त्यांना त्या हव्या म्हणून ती करीत असतात. स्वनियंत्रण शिकविणे म्हणजे या उस्फूर्तपणावरच नियंत्रण करायला शिकवणे असते. त्यामुळे मुले त्यांना घालून दिलेले नियम वारंवार झुगारणारच आहेत. अशा वेळी त्यांना शिक्षा करण्यापेक्षा आपण धीराने पुन्हा एकदा समजावून सांगितले पाहिजे. मूल थोडेसे रडले की लगेच दुधाची वेळ नसली तरी त्याला पाजायला घेणे किंवा आपल्या कामाच्या गडबडीत मुलांची झोपेची वेळ टळू देणे यामुळे त्यांच्या मनात गोंधळ निर्माण होतो. झोपेसाठी किंवा दुधासाठी थांबायचे का नाही हे मुलांना कळत नाही. म्हणूनच हे काम अत्यंत जाणीवपूर्वक झाले पाहिजे.

यासाठी सर्वात महत्त्वाची असणारी पहिली गोष्ट म्हणजे घरातील सर्वांमध्ये एकवाक्यता असणे. आई स्वयंनियंत्रण शिकवू पाहत असेल तर बाबांनी किंवा आजीने म्हणायचे, ''घे ना गं त्याला! केव्हाचा रडतोय. भूक लागली असेल.'' म्हणजे बाळाचा उडालाच गोंधळ.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे सातत्य. प्रौढांच्या सोयीनुसार किंवा लहरीनुसार दिनक्रमात बदल होता कामा नये. हीच गोष्ट वर्गातील नित्यक्रमालाही लागू आहे. वर्गातील मुलांच्या वागणुकीच्या अपेक्षा आधीच स्पष्ट कराव्यात, जसे की, 'विचारल्याशिवाय वर्गाबाहेर जायचे नाही' किंवा 'एखादा खेळ हवा असला तर भांडाभांडी न करता मागून घ्यायचा'. वर्गातील नियम राबविण्यात सातत्य असेल तरच वर्ग सुरळीत चालतो. मुलांसाठी जसे नियमांचे पालन व्हायला हवे तसेच शिक्षिकांनीही विचारपूर्वक, मुलांचे वय लक्षात घेऊन बालशाळेचा दिनक्रम आखलेला असावा, उदा. एका जागी स्वस्थ बसून करण्याची कामे १० मिनिटांपेक्षा जास्त वेळ असू नयेत. अशी दक्षता घेतल्याने मुलांना नियम पाळणे सोपे होते. शाळेत आणि घरी स्वयंनियंत्रण शिकवण्याच्या विविध संधी आपण पाहूया.

नियमित दिनक्रम असणे: बालकांचा घरी दररोज एक ठरलेला दिनक्रम असावा. सकाळी उठणे, शाळेसाठी तयार होणे, शाळेतून परत आल्यावर जेवून झोपणे, संध्याकाळी खेळायला जाणे, खेळून आल्यावर हात-पाय धुणे, ठराविक वेळी रात्रीचे जेवण असणे, टी.व्ही. बघणे किंवा आई-बाबांनी वाचून दाखवणे, ठराविक वेळी झोपणे असा मुलांचा दिनक्रम आखलेला असावा. बाबा उशीरा आले म्हणून मुलांचे जेवण उशीरा, घरी पाहुणे आले आहेत म्हणून दुपारची झोप रद्द असे बदल शक्यतो फार वेळा होऊ देऊ नयेत.

बालशाळेतही मुलांचा दिनक्रम ठरलेला असावा. बालशिक्षिकेने दररोज परिपाठानंतर दिनक्रम वाचून दाखवावा. मुले आपापले खेळ खेळत असताना एखाद्या गटाकडे जाऊन आता यानंतर आपण काय करणार आहोत?' असा प्रश्न विचारून आपल्या दिवसाचा ठरलेला क्रम मुलांच्या लक्षात आणून द्यावा. वेळेच्या सुनियोजनामुळे मुलांना सुरक्षित वाटते. आपणही एखाद्या कार्यक्रमाला गेलो की आधी कार्यक्रम पत्रिका बघतो. कार्यक्रम किती वेळ चालणार आहे, कोण, केव्हा बोलणार आहे हे कळल्यानंतर अनिश्चिततेचा ताण नाहीसा होऊन आपण कार्यक्रमाचा अधिक आनंद घेऊ शकतो.

कामांची जबाबदारी उचलणे: दररोज करावयाच्या काही कामांची जबाबदारी मुलांवर टाकावी. उदा. शाळेतून आल्यावर बूट/चप्पल, दप्तर, डबा, पाण्याची बाटली जागच्या जागी ठेवण्याची, हात-पाय तोंड स्वच्छ धुण्याची, गणवेश बदलून घरचे कपडे घालण्याची व महत्त्वाचे म्हणजे या सर्व गोष्टी दररोज न सांगता करण्याची जबाबदारी मुलांवर टाकावी.

बालशाळेमध्येही मुलांनी अशा जबाबदाऱ्या उचलणे महत्त्वाचे आहे. आल्याआल्या आपला डबा, पाण्याची बाटली जागच्या जागी ठेवणे, चप्पल ओळीत काढणे ही आपली कामे आहेत आणि ती आपण करायची असतात, आपापले खेळून झाले की आवरून ठेवायचे असते कारण व्यवस्थितपणा महत्त्वाचा असतो, सतरंजीची घडी घालायला किंवा ठोकळ्यांचा बॉक्स उचलायला गरज वाटली तर ताई मदत करतात पण मुळात हे आपले काम आहे, या गोष्टी मुलांना समजल्या पाहिजेत.

सहकार्याने खेळणे व आपसात तंटा सोडवणे : घरी जेव्हा वयात फारसे अंतर नसणारी भावंडे असतात तेव्हा न भांडता तंटा परस्पर सामंजस्याने कसा सोडवावा हे शिकवण्याच्या संधी उपलब्ध होतात. शाळेत ३० किंवा अधिक एकाच वयाची मुले वर्गात असताना ही कौशल्ये मुलांच्यात जोपासण्याची कितीतरी अधिक मोठी संधी शिक्षकांना मिळते. याची काही उदाहरणे पाहू.

शाळेत मर्यादित साहित्य व जागा उपलब्ध असते. ती सर्वांनी एकमेकांबरोबर वाटून घ्यायला हवी. एका खेळाच्या



कोपऱ्यात चार बस्करे आहेत आणि तेथे चार मुले बसून खेळत आहेत. आपल्याला जर तोच खेळ खेळायचा असेल तर आपल्याला एखादी जागा रिकामी होण्याची वाट बघावी लागेल. तसेच एक ताई आणि १० मुले असताना ताईंनी सारखे आपल्याचकडे लक्ष द्यावे अशी अपेक्षा करून चालणार नाही. ताई दुसऱ्या एखाद्या मुलाशी बोलत असताना आपण मध्येच काहीतरी बोलून ताईंचे लक्ष वेधून घ्यायचे नाही हे मुलांना समजायला हवे.

दोन मुले भांडताना दिसली किंवा ऐकू आली तर दोघांनाही ते सोडविण्यासाठी बोलावून चर्चा केली पाहिजे. उदा. एका मुलाने दुसऱ्याला मारले व दुसऱ्यानेही पहिल्याला उलट मारले. अशावेळी साधारणतः रडणाऱ्या मुलाकडे शिक्षकांचे प्रथम लक्ष जाते. त्यावेळी दोघाही मुलांना इतरांपासून दूर काढावे व मारणे हे काही बरोबर नाही हे स्पष्ट करावे. आधी कोणी मारले याला महत्त्व नाही, परिणाम दोघांनाही भोगावे लागणार, हे स्पष्ट करून दोघांनाही ५ मिनिटे 'विचाराच्या कोपऱ्यात' बसवावे.

पर्याय देणे हा भांडण सोडविण्याचा दुसरा एक मार्ग आहे. एका मुलीने ठोकळ्याच्या कोपऱ्यात घर बांधले. दुसरीलासुद्धा ठोकळे खेळायचे होते, म्हणून तिने पहिलीचे घर पाडले. आरडाओरडा व रडारडी सुरू झाली. अशा वेळी त्या दोन मुलींना इतरांपासून वेगळे काढावे व त्यांच्याशी ठोकळ्यांचे घर का पाडले, त्यामुळे बांधणाऱ्या मुलीला काय वाटले आणि आता काय करावे याविषयी बोलायला सांगावे. घर पाडणाऱ्या मुलीसमोर दोन पर्याय आहेत. एक म्हणजे माफी मागून घर परत बांधायला पहिल्या मुलीला मदत करणे (फक्त सॉरी म्हणणे हा पर्याय नाही.) किंवा पहिल्या मुलीला जर मदत नको असेल तर शांतपणे तिचे खेळून व्हायची वाट पाहणे.

अमुक एक चूक आहे किंवा अमुक एक कर किंवा करू नकोस, असे मुलांना सांगणे आणि पद्धतशीररीत्या स्वनियंत्रण शिकण्यासाठी आवश्यक ती कौशल्ये मुलांच्या ठायी जोपासणे यात फरक आहे. पहिल्या पद्धतीत मुले आपल्या कृतीबद्दल विचार करायला किंवा आपली कृती आणि त्याचे परिणाम यांचा संबंध लावायला शिकत नाहीत. उलट शिक्षा झाल्यामुळे अथवा ओरडा खाल्यामुळे आपण पकडले जाणार नाही अशी शिताफी मात्र शिकतात. आपल्याला जर खरोखरच मुलांनी काय बरोबर आणि काय चूक हे शिकायला हवे असेल, आणि शिक्षेच्या भीतीने नव्हे, तर अमुक एक गोष्ट चुकीची आहे म्हणून मी ती करणार नाही असे म्हणायला हवे असेल तर आपल्याला त्यांना स्वतःची कृती आणि त्याचे परिणाम यात परस्पर संबंध जोडण्याची प्रक्रिया शिकण्यास मदत करायला हवी.

स्वनियंत्रण शिकणे हे एखादी नवी संकल्पना शिकण्यासारखे असते. सर्वप्रथम निरीक्षणातून किंवा ऐकण्यातून किंवा स्वानुभवातून या नव्या संकल्पनेची मुलांना जाणीव होते. मुलांना जर मनापासून शिकण्याची इच्छा असेल तर ती त्याविषयी विचार करू लागतात. हळूहळू ती प्रयत्नपूर्वक ही संकल्पना समजून घेतात व इतरांच्या मदतीने किंवा स्वप्रयत्नाने ती आत्मसात करतात.इतर अनेक गोष्टींप्रमाणेच याही बाबतीत आजूबाजूला असणाऱ्या प्रौढांकडे बघूनच मुले शिकतात. म्हणून सर्वच प्रौढांनी आपण आपल्या मुलांसमोर स्वनियंत्रणाचे काय आदर्श ठेवतो याचा विचार करायला हवा आणि स्वनियंत्रणासाठी आवश्यक ती कौशल्ये शिकण्यास मुलांना विचारपूर्वक मदत करायला हवी.

**डॉ. नीलिमा गोखले**
neelima.gokhale@gmail.com
9823053272

**डॉ. मंजिरी निंबकर**
manjunimbkar@gmail.com
9822040586

## वाचन आणि मी (पान ७ वरून)

त्यात आतापर्यंतच्या वाचनाने तयार झालेला माझा पिंड आजूबाजूच्या व्यवस्थेत बदल घडवू पहात होता. पण वर्षानुवर्षे हा प्रवाह ज्या दिशेने जात होता त्याच दिशेने पुढे जात राहणार हे समजून चुकले आणि त्यातून एकटे पडण्याची परिस्थिती निर्माण झाली. मी अंशत: समाजापासून तुटला गेलो. याच एकटेपणाच्या काळात मी सातत्याने स्वत:सोबत राहिलो आणि त्याचवेळेस मला हे उमगले की समाजातील किवा व्यवस्थेतील हा बदल अचानक होणारा नसून त्यासाठी जाणीवपूर्वक सातत्याने अनेकांनी छोटी छोटी पावले उचलणे गरजेचे आहे (त्यापैकी हे एक पाऊल). हळूहळू माझी आत्मशोधनाची प्रक्रिया सुरू झाली आणि या प्रक्रियेला मी मागे उल्लेखलेली माझ्या नकळत मला जडलेली चिंतनाची सवय साह्यभूत झाली. माझे वाचन हे आता जास्तीत जास्त अभ्यास स्वरूपाचे होत गेले. वेगवेगळे वाद, विचारधारा कळत गेल्या आणि त्यातून माझी स्वत:ची अशी विचारसरणी तयार होऊ लागली.

याच काळात माझ्या वाचनात आणि पाहण्यात इंग्लिश वृत्तवाहिन्या व पुस्तके आली. इंग्लिश वृत्तवाहिन्या पाहून मला भारताबरोबर जगात काय चालले आहे याची चाहूल घेता आली. आंतरराष्ट्रीय वृत्तवाहिन्यांच्या पाहण्यातूनच मला आंतरराष्ट्रीय राजकारण आणि एकूणच समाजव्यवस्था, त्यात पॅलेस्टाईन, इस्त्राईल, अमेरिका, इराक यातील संघर्ष इ. स्वरूपाचे ज्वलंत मुद्दे कळले आणि त्यातूनच माझे वाचन मी आंतरराष्ट्रीय राजकारण व समाजव्यवस्था यासंबंधीच्या साहित्याकडे वळवले.

वाचनाचे एक महत्त्वाचे माध्यम म्हणून इंटरनेटचा उल्लेख करायला हवा. जरी इंटरनेटमुळे जगाची अद्ययावत माहिती कळत असली तरी लेखाच्या सुरुवातीला दिलेल्या व्याख्येच्या संदर्भात इंटरनेटवरील वाचनाचा विचार करायचा झाल्यास ते कुठे बसते हे मला अजून कळलेले नाही. माझे निरीक्षण असे आहे की इंटरनेटवरील वाचन हे जास्त करून चटपटीत स्वरूपाचे असते आणि जर तुम्हाला आशयसंपन्न वाचन करायचे असेल तर त्यासाठी खूप शोध घ्यावा लागतो. पण एवढे असूनही टी.व्ही. व इंटरनेट यांची एक माध्यम म्हणून असणारी उपयुक्तता आपण नाकारू शकत नाही. कारण शेवटी निवड स्वातंत्र्य आपल्यालाच असते. आपल्या विचारांची रुंदी व खोली वाढवण्यासाठी तसेच आपल्या

विचारसरणीहून भिन्न स्वरूपाच्या विचारधारा समजून घेण्यासाठी टी. व्ही. व इंटरनेट या माध्यमांचा उपयोग वाचनाला पूरक म्हणून करायला हवा. विचारांचा पाया घालण्याचे काम मात्र पुस्तकेच करतात असे माझे मत आहे.

थोडक्यात आपला वैचारिक गाभा तयार करण्याचे काम साहित्य करत असल्यामुळे लहानपणापासूनच मुलांना सकस साहित्याची उपलब्धता करून दिली पाहिजे. आणि त्याचबरोबर साहित्याची ओळख, त्यापुढे जाऊन विकसित होणारा प्राथमिक स्वरूपाचा विचार, त्यामुळे होणारी समाजाची ओळख व त्याही पुढे जाऊन विचारांमध्ये स्पष्टता येऊन त्याचे विशिष्ट प्रकारच्या विचारधारेत होणारे रुपांतर या सर्व टप्प्यांकडेही आपले लक्ष असले पाहिजे. तरच भविष्यकाळातील भारतीय समाज विचारी तसेच कुठल्याही समस्येकडे बघण्याची स्वतःची दृष्टी असलेला आणि प्रवाहाच्या मागे न धावता वेगळा विचार करण्याची वृत्ती बाळगणारा बनेल.

**प्रथमेश इनामदार**
psinamdar27@gmail.com
9673739107

## वाचन नेमकं काय करतं ? (पान ५ वरून)

क्लोजअपमध्ये नवाजुद्दीन ब्लँक झालेला दिसला. काय... काही नाही... राहिलो करत... दुसरं करणार काय... असं उत्तर त्यानं दिलं. क्लोजअपचा चेहरा पुरेसा बोलका होता. नवाजची अस्वस्थता दाखवणारा होता. पण प्रश्नकर्त्याचं समाधान होत नव्हतं. त्याला मी टिकून राहिलो, मनाचा निर्धार केला, निकराची झुंज दिली, परिस्थितीशी मुकाबला केला, रस्त्यावर झोपलो, वडापाव खाऊन दिवस काढले वगैरे वगैरे हवं होतं. नवाजनं ते केलंही असेल, पण तो ते काही बोलत नव्हता. कदाचित आपण एवढं ठरवून करतही नाही काही गोष्टी. त्या घडत राहतात आणि आपण मूक पाहतो किंवा सामील होतो, कधी प्रतिकार करतो. पण त्याची सांगितलेली गोष्ट नेहमी पक्की सुबक, सोप्पी, सुटसुटीत आणि रेषीय असली पाहिजे असा आपला आग्रह असतो. त्याशिवाय ती प्रेरणादायी वाटणार नाही. अंगावर रोमांच येणार नाहीत. त्याचमुळे की काय, आपल्या लिहिल्या इतिहासाची आजची ही अवस्था आहे असं वाटतं. आपल्याला न आवडणारं, रुचणारं लेखनात काही नसावं. ते आपण वाचतही नाही.

वसंत नरहर फेणे लिखित 'सेन्ट्रल बस स्टेशन' नावाची कादंबरी एका दिवसाच्या घटनाक्रमाच्या माध्यमातून एसटी विश्वाचं वास्तव आपल्यासमोर अत्यंत बेधडक मांडते. त्यात एक घटना आहे. नगरपालिकेचा मैला टँकर सेन्ट्रल बस स्टेशन नाशिकच्या बस स्टँडवर येतो, मैला उपसा करतो पण पावसाच्या चिखलात अडकून पडतो. तर मैला टँकरचा मुकादम, कावळेसाहेबांना डबल चार्ज लावण्याची भीती घालतो. कावळे मवाळ माणूस. त्यांची तगमग होते. पण तिळवेसाहेब- डेपो मॅनेजर- त्या मुकादमाचा समाचार घेतो. तिळवेची वाक्ये पहा.

तिळवे डांगरीवाल्याला म्हणाला,

''जा डेपोत जा. मांडके मेकॅनिकला म्हणावं दोन जॅक घेऊन ये. कशाला? समजलं का?''

''अं-हो-अं? नाय साहेब...'' तो चाचरत बोलला.

''अरे, ही पडलीये ना इथं म्युनिसिपाल्टीच्या प्रेसिडेंटची रुंद ढुंगणाची सासू! आपली फाकून इथं रुतून बसलीय... तिचं ढुंगण उचलायचय. जा पळ. दोन चार माणसंही घेऊन ये म्हणावं.''

आता ही भाषा बऱ्याच लोकांना अप्रिय वाटते. लोकांनी तसं बोलून दाखवल्याचेही दाखले दिसतात. पण हीच भाषा मला रस्त्यावर, जगात दिसते. जर साहित्य वास्तवाचं प्रतिबिंब आहे तर मग वास्तव अप्रिय वाटतं का? की ते नाकारणं हाच हेतू आहे? मग वाचनात आपल्याला काय हवं आहे?

खानोलकरांचं 'अजगर' आणि ढसाळांचं 'गांडू बगीचा' यांमध्ये नक्की काय साम्य, काय फरक आणि काय रुचणारं? काय बीभत्स? शील-अश्लीलतेच्या पारंपरिक संकल्पनेला धक्का पोचवण्याचे काम खूप साहित्यिकांनी केलं असलं तरी समाजमनात खूप खोल त्यांची मूल्य संस्था आणि त्याचं व्यवस्थापन ठरलेलं आणि टिकलेलं आहे. म्हणजे समाज आपली समज टिकवून त्याला रुचेल, झेपेल तेच धरून वाचतो. अर्थात हे बोलताना अपवाद वगळले आहेतच, कारण एखादं विधान करताना सर्वसामान्यपणे काय दिसतं याचा विचार इथे केलेला आहे. कारण सतत वाचणारी, खूप वाचणारी अशी बिरुदावली मिरवणारी कित्येक समजशून्य माणसं ठरलेल्या चवीचीच पुस्तकं वाचताना दिसतात.

आमची काही मित्रमंडळी वाचनालय चालवतात आणि वाचन संस्कृती वाढवण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या मते वाचन म्हणजे नुसती क्रिया, किंवा सवय नसून डोळ्यातून जाणाऱ्या शब्दांचं मेंदूत घुसून त्याच्यावर प्रक्रिया होणं, आणि त्याबाबत स्वतंत्र विचार होणं, आपल्या उबदार जगाबाहेरचा किंवा पलीकडील विचार पाहणं आणि त्यास त्याचं मत मांडण्यासाठी आपल्या मनात निदान जागा निर्माण करणं आणि मग आपल्या आणि त्याच्या विवेकाची होणारी आंतरक्रिया तटस्थ पाहणं आणि जे तरून निघेल ते घेणं, आत्मसात करणं आणि आपली समज समृद्ध करणं असं त्यांना वाटतं. वाचन नेमकं काय करतं याला हे उत्तर पटणारं आहे. किंबहुना वाचनानं हे मानवाच्या मनात घडवलं तरच त्याच्या समजेमध्ये भर पडेल असं वाटतं आणि ते वाचनाचं मुख्य काम आहे असं मला वाटतं.

**वसीम मणेर**
wasim@biroba.com
8888826275

Published & Posted on 16 August 2015
Posted at Marketyard PSO, Pune 411037.
on 16th of each month

RNI No. MAH MAR 2001/4166
Registered No. PCW/ 026/ 2015-2017

# शहाणी वेबपाने

मागील अंकात आपण सर्वज्ञात असलेल्या गूगलच्या सेवांबद्दल माहिती घेतेली आहे. आता आपण गूगलच्या थोड्या आगळ्यावेगळ्या रंगांचा एक आढावा घेऊयात.

आज स्मार्टफोन आणि टॅबने सर्व जग व्यापले जात आहे. अँड्रॉइड वापरणाऱ्यांसाठी ॲप्लिकेशन्सचे दुकान म्हणजे 'गूगल प्ले स्टोअर'. आपल्या फोनसाठी विविध ॲप्स येथून मिळवता येतात. हल्ली विविध शैक्षणिक ॲप्स तयार केले जात आहेत. या ॲप्सच्या दुनियेत मराठी माणसाने देखील उडी घेतली आहे. काही महिन्यांपूर्वी 'चावडी' हे ॲप खूप चर्चेत होते. या ॲपमधून शेतीपूरक उद्योग, महिला गृह उद्योग व इतर औद्योगिक माहिती मिळत होती म्हणूनच हे ग्रामीण भागात बरेच लोकप्रिय झाले होते. गूगल रोज नवनव्या गोष्टी आपल्या दुकानात सामील करीत आहे.

गूगलची अतिशय नावाजलेली ऑर्कुट ही सोशल नेटवर्किंग साईट गूगलने बंद केली. मात्र त्याबरोबरच नवीन गूगल प्लसही सेवा आणली. 'बघता काय, सामील व्हा' अशी या सेवेचे उद्घाटन करताना जाहिरात करून खूप मोठा तरुण वर्ग या सेवेकडे वळवला. आजच्या सोशल नेटवर्किंग साईटवर असणाऱ्या सर्व सुविधा येथे पुरवल्या जातात. यावर विविध कम्युनिटीज, ग्रूप्स तयार करता येतात. जगभरातील विवध क्षेत्रांतील कम्युनिटीजसोबत आपण जोडले जाऊ शकतो. एखाद्या विषयावर आपण चर्चागट तयार करू शकतो. अतिशय सोपी रचना, सुरक्षितता, व्यापकता अशी या सेवेची ख्याती समजली जाते.

'ज्ञान हीच खरी संपत्ती' असा पवित्रा गूगलने घेतला आणि ऑनलाइन पुस्तकालय उभे केले. गूगलद्वारा दिल्या जाणाऱ्या 'गूगल बुक्स' या सेवेत पुस्तके शोधता येतात, काही मोफत उपलब्ध असलेल्या पुस्तकांचे संपूर्ण वाचन करता येते, पुस्तकांचे पूर्वावलोकन, पुस्तकांबद्दलची समीक्षणे आणि वाचकांच्या प्रतिक्रिया पाहता येतात आणि पुस्तकांची खरेदी अथवा वाचनालयातून मागणीही करता येते. गूगल बुक्सच्या माध्यमातून जगातील कोणत्याही भाषेतील पुस्तक आपण शोधू शकतो.

अगदी काल परवाच गूगलने स्वतःची होम वायरलेस ब्रॉडबँड इंटरनेट सेवा सुरू केली. अजून ही सेवा सर्व ठिकाणी पूर्णतः कार्यन्वित झालेली नसली तरी इंटरनेटच्या गती प्रमाणेच हिची लोकप्रियता वाढत चालली आहे. घरातील कोपऱ्या-कोपऱ्यात चांगले इंटरनेट स्पीड मिळणारी अशी या सेवेची जाहिरात केली जात आहे.

इंटरनेटवर विविध सेवा वापरायच्या म्हटल्या की एक अकाउंट असावे लागते. त्यासाठी यूझर नेम आणि पासवर्ड आवश्यक असतो. प्रत्येक ठिकाणचे विविध पासवर्ड आणि यूझर नेम लक्षात ठेवणे म्हणजे एक डोकेदुखीच वाटते. पण गूगलच्या या सर्व सेवा एकाच अकाउंटद्वारे वापरता येतात. एकदा तुमचे गूगल अकाउंट तयार झाले की तुम्ही गूगलच्या कोणत्याही सेवेत प्रवेश करू शकता.

गूगलबद्दल बोलताना एक मुद्दा वगळून चालणार नाही, तो म्हणजे प्रायव्हसी. गूगलमार्फत आपण इंटरनेटवर सतत ट्रॅक केले जातो. आपण काय सर्च केले, कुठल्या साईट वरुन कुठल्या दुसऱ्या साईटवर गेलो, काय कंटेन्ट पाहिले, किती वेळ कुठल्या साईटवर थांबलो याची पूर्ण माहिती मिळवली जाते. ट्रॅकरच्या सहाय्याने आपला माग काढला जातो. यूट्यूबर कुठली कुठली गाणी पाहिली यावरून आपल्याला कुठल्या प्रकारची गाणी आवडतात ते समजते. कोणत्या प्रकारचे इमेल आपल्याकडून पाठवले जातात यावरून आपला व्यवसाय, शिक्षण आणि गरज अशी माहिती ट्रॅकरच्या सहाय्याने काढली जाते. या सर्व माहितीचा उपयोग अनेक प्रकारे करता येतो. आज तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात जी स्पर्धा सुरू आहे त्या स्पर्धेत टिकण्यासाठी आणि पुढे जाण्यासाठी वापरकर्त्याला त्याच्या व्यवसायाशी, शिक्षणाशी, आवडीनिवडीशी निगडीत माहिती आणि जाहिराती पुरवल्या तर वापरकर्ता जास्त आकर्षला जाणार हे गूगलने पक्के ओळखले आहे. यात गूगलला 'इंटरनेट जायंट' असेच संबोधले जाते. हा प्रायव्हसीचा मुद्दा आज सतत चर्चिला जातो, अमेरिकासारख्या देशात त्यासंबंधी विधेयेक आणले जाते मात्र समाधानकारक काही बाहेर निघत नाही. गूगलसेवांबाबत आपली किती आणि कोणत्या प्रकारची माहिती शेअर करायची याचे भान आज प्रत्येक वापरकर्त्याने ठेवणे गरजेचे आहे.

आज जिथे आपला दिवस गूगल कॅलेंडरमधल्या रिमाइंडरने सुरू होतो आणि अनोळखी ठिकाणी पोचण्यासाठी गूगल मॅप्स आणि नेव्हिगेशनशिवाय आपले पान हालत नाही, तिथे बहुरूपी गूगलच्या सर्वच सेवांनी आपल्याला आपल्या व्यावसायिकच नाही तर व्यक्तिगत आयुष्यातही स्वत:वर आश्रित राहण्यासाठी भाग पाडले आहे असे वाटत राहते.

**प्रकाश अनभूले**
anbhuleprakash@gmail.com
9960460474